विशेष **दिवाणी दावा क्र. ६४/२०२५**
**युनियन ऑफ इंडिया वि. गोविंद मुंद्रा वगैरे**
CNR No. MHRG020000902007

**<u>निशाणी क्र. १४२ वरील आदेश</u>**

(पारित दिनांक १९/०७/२०२५)

मयत प्रतिवादी क्र. ३ यांचे वारस अभिलेखावर घेण्याकरिता वादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्यांचे म्हणणे असे की प्रतिवादी क्र.३ विश्वनाथ दाते हे दिनांक २४/०३/२०२० रोजी मयत झाले असुन त्यांना प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ हे कायदेशीर वारस असुन अन्य कोणीही कायदेशीर वारस नाहीत. त्यामुळे दाव्याच्या सरनाम्यामध्ये आवश्यक ती दुरुस्ती करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती वादीने केली आहे.

२. प्रतिवादी क्र. ३, ४अे ते ४डी, ५अे/३ व ५डी यांनी सदर अर्जास हरकत घेतली आहे की, वादी शासन आहे म्हणुन त्यांना प्रतिवादीच्या कुटूंबाची माहिती नव्हती हे मान्य करता येणार नाही. वादींनी वेळेत अर्ज केलेला नाही, त्यामुळे अर्ज फेटाळण्यात यावा, अशी या प्रतिवादींची विनंती आहे.

३. अभिलेखाचे अवलोकन केले. अर्जाचे पुष्ट्यर्थ वादीतर्फे अधिका–याने शपथपत्र दाखल केलेले आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र. ३/१ व ३/२ हेच मयताचे कायदेशीर वारस असुन अन्य कायदेशीर वारस नसल्याचे ते शपथेवर कथन करतात. प्रतिवादी क्र. ३ विश्वनाथ दाते यांचे मृत्युप्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत निशाणी क्र. १३३ च्या यादीसोबत दाखल केली असुन त्यावरुन ते दिनांक २४/०३/२०२० रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होते. अर्ज करण्यास झालेला विलंब नि.क्र. १४० वर आदेश करुन माफ करण्यात आला आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र. ३ च्या नावासमोर तशा प्रकारची नोंद घेवून सरनाम्यामध्ये

अनुषंगिक बदल करणे आवश्यक आहे. परिणामी अर्ज मंजुर करुन खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | वादींनी पुढील तारखेपर्यंत दाव्यात दुरूस्ती करून दाव्याची दुरूस्त प्रत न चुकता दाखल करावी. |

AMOL ASHOK SHINDE
Digitally signed by AMOL ASHOK SHINDE
Date: 2025.07.21 10:51:22 +0530

**अलिबाग** **(अमोल अ. शिंदे)**

**दिनांक – १९.०७.२०२५** **सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अलिबाग**